रे.के.नं. ५२/२१

नि.क्र. ४५/क

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | रणजित शशिकांत भोसले |
| वय | – | ३४ वर्षे |
| व्यवसाय | – | नोकरी |
| राहणार | – | कामटा, ता. उरण, जि. रायगड |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. कदम यांच्यामार्फत...**

१. मी आरोपींना ओळखतो. आरोपींच्या चुलत्याची पिरवाडी रस्त्यावर पानटपरी आहे. मी तेथे बसण्यासाठी जात असे. तेथे आरोपींचे दुकान आहे. दिनांक ३१.०१.२०२० रोजी सायंकाळी ६.०० वाजता मी सदर टपरीवर गेलो होतो. तेथे मी, शिवाजी थोरात व त्याची पत्नी गप्पा मारत होतो. त्यावेळी रात्री ८.३० वाजण्याच्या सुमारास जखमी संतोष व आरोपी निलेश यांच्यात भांडण लागले. मला भांडणाचा आवाज आला होता. त्यावेळी मी पाहिले. आरोपी महेश हा देखील होता. महेश याने संतोषचे हात पकडले होते. आरोपी निलेश याने जखमी संतोष याला स्टंपने डोक्यात व हातावर मारले. त्यामुळे संतोष जखमी होउन त्याचा हात मोडला. त्यानंतर मी तेथून निघून गेलो. आरोपीने वापरलेला स्टंप दाखवल्यास मी ओळखू शकतो. मुद्देमाल आर्टीकल अ साक्षीदारास दाखवण्यात आला. त्याने तो ओळखला. आरोपी निलेश आज न्यायालयात हजर आहे. आरोपी महेश यास पोलीसांनी पकडलेले आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. अमर पाटील यांच्यामार्फत...</u>**

२. माझ्या कामाची वेळ निश्चित नसते. मी घटनेसंदर्भात घटनेच्या दिवशीच रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास पोलीस ठाण्यात गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी त्याच दिवशी माझा जबाब नोंदवला. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्यादी शोभा हिचा मुलगा संतोषसोबत आज न्यायालयात आलेलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी त्याच्या सोबत इथे बसलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी त्याच्यासोबत चर्चा केली. हे म्हणणे खरे नाही की, संतोष याने मला साक्ष कशी द्यायची हे सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी आणि आरोपी यांच्यात सदर टपरीवरून अनेक वर्षांपासून वाद चालू आहेत. हे मला माहिती नाही की, त्यावरून फिर्यादी व आरोपी यांनी एकमेकांविरूद्ध अनेक एन.सी. दाखल केल्या आहेत.

३. हे म्हणणे खरे आहे की, मी भांडण सोडवण्याचा प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोणतेही भांडण झालेले नसल्याने मी ते सोडवण्याचा प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटना माझ्या पाठीमागे घडली असल्याने मी प्रत्यक्ष पाहिली नाही. घटना साधारण १५ मिनीटे चालू होती. हे म्हणणे खरे नाही की, मी संतोष शाम जाधव याच्या सांगण्यावरून साक्ष देण्याकरीता आज आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनेची वैयक्तिक माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीसोबत माझे घरगुती संबंध असल्याने मी त्यांना वाचवण्याकरीता खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ३१.०१.२०२० नंतर मी प्रस्तुत घटनेच्या संबंधात पोलीस ठाण्यात गेलो नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर पोलीसही माझ्या घरी आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्विकृत

उरण, (विकास डी. बडे)

दिनांक – ३१.०७.०२०२३ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण